मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 3 ऑक्टोबर 2025 | पान- 1

# दसऱ्याच्या मुहूर्तावर इलेक्ट्रॉनिक वस्तू, सोने, वाहन खरेदीचा उत्साह!

**पिंपरी । प्रतिनिधी**

विजयादशमी म्हणजे दसरा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक. असत्यावरील सत्याच्या विजयाचा उत्सव. आपुलकीने सोनं लुटायचा आणि आनंदाचं तोरणं दारी बांधायचा. त्याच्या पूर्वतयारीसाठी बुधवारी (ता.१) बाजारपेठांमध्ये नवचैतन्य पसरले. इलेक्ट्रॉनिक वस्तू, कपडे, सोने, वाहन खरेदीसाठी नागरिकांचा उत्साह दिसून आला.

दसऱ्याच्या दिवशी पूजनात महत्वाचे स्थान असलेली झेंडूची फुले, आपट्याची पाने, पूजेचे साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारपेठांमध्ये मोठी गर्दी झाली. इलेक्ट्रिक वस्तू, वाहने, सोने यांचे आगाऊ बुकिंग करून दसऱ्याच्या दिवशी खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल दिसून आला. विजयादशमी निमित्त घर, वाहनांना झेंडूच्या फुलांचे तोरण लावले जाते. त्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर फुलांची खरेदी केली. त्यासोबतच तयार हार, नारळ, पूजेचे साहित्य आणि मिठाई यांचीही खरेदी करण्यात आली.

**शहरातील मंदिरांमध्येही गर्दी**

शहरातील देवीच्या मंदिरांमध्ये होमहवन करून पूर्णाहुती करण्यात आली. प्रथेप्रमाणे मंदिरांमध्ये आणि घरोघरी बसविण्यात आलेल्या घटांचे विसर्जन बुधवारी करण्यात आले. नैवेद्यासाठी पुरणपोळीचा स्वयंपाक करण्यात आला. महिलांनी आपला नऊ दिवसांचा उपवास सोडला. शेवटच्या माळेला देवीचे दर्शन घेऊन ओटी भरण्यासाठीही महिलांनी देवीच्या मंदिरामध्ये गर्दी केली.

दसऱ्याच्या दिवशी खरेदी करणे शुभ मानले जाते. हा मुहूर्त साधण्यासाठी दसऱ्याच्या पूर्वसंध्येपासूनच शहरातील बाजारपेठांमध्ये गर्दी दिसून आली. पूजेच्या साहित्य खरेदीनंतर ग्राहकांची पाऊले इतर दुकानांकडे वळली.



# हजारो स्वयंसेवक ऐतिहासिक पथसंचलनाचे साक्षीदार!

## ठिकठिकाणी नागरिकांतर्फे उस्फूर्त भव्य स्वागत, अनेक मान्यवरांनी उपस्थिती



**पिंपरी | प्रतिनिधी**

शिस्तबध्दरित्या ओळीत चालणारे एकसारख्या संघ गणवेशातील दंडधारी स्वयंसेवक, लयबद्ध रचना सादर करीत संपूर्ण वातावरण भारावून टाकणारे घोषपथक आणि मध्यभागी डौलात फडकणारा भगवा ध्वज अन् त्यावर नागरिकांकडून होत असलेली पुष्पवृष्टी स्वागत..! निमित्त होते पिंपरी चिंचवड शहरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी पथसंचलनाचे. यावर्षी संघाला १०० वर्षे पूर्ण झाल्यामुळे स्वयंसेवक व संपूर्ण समाजामध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

राष्ट्रहित व सेवा कार्यासाठी सदैव कटिबद्ध असणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे विजयादशमी निमित्याने शहरात आज २ ऑक्टोबर व २८ सप्टेंबर रोजी पिंपरी चिंचवड शहरातील तब्बल ४५ ठिकाणी देहूरोड आकुर्डी, रावेत, हिंजवडी पूनावळे, वाकड थेरगाव, चिंचवड पूर्व – पश्चिम, पिंपरी, काळेवाडी, पिंपळे निलख, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, सांगवी, कासारवाडी, आळंदी, मोशी, संभाजी नगर, चिखली, आळंदी, निगडी, संत तुकाराम नगर, दिघी, चऱ्होली, भोसरी, इंद्रायणी नगर नियोजित मार्गावर संघ गणवेशातील स्वयंसेवकांचे सदंड पथसंचलन उत्साहात संपन्न झाले.

घोषाच्या तालावर हजारो स्वयंसेवकांनी संचलनात सहभाग घेऊन सामूहिकतेचे दर्शन घडविले. विविध क्षेत्रातील मान्यवर, प्रमुख अतिथी, लोकप्रतिनिधी विविध भागातील संचलनात सहभागी झाले होते. ठिकठिकाणी नागरिकांनी उस्फूर्तपणे पुष्पवृष्टी, भारत माता की जय च्या जयघोषात रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून भव्य स्वागत केले.

# आकुर्डी येथील खाद्यपदार्थ केंद्रातील गाळ्यांचा ई-लिलाव

## 97 महिला बचत गटांचा उत्स्फूर्त सहभाग :



> “पिंपरी चिंचवड महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत महिलांना उपजीविका निर्मितीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आकुर्डी फूड कोर्टाद्वारे आपण ही सुरूवात केली आहे. या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे, त्यांना स्वतःचा व्यवसाय उभा करण्याची संधी देणे आणि समाजातील दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणणे हा आमचा उद्देश आहे. गाळ्यांचे वाटप पारदर्शक पद्धतीने ई-लिलावाद्वारे करण्यात आल्यामुळे प्रत्येक गटाला समान संधी मिळाली आहे. या उपक्रमामुळे महिला बचत गटांच्या कार्याला प्रोत्साहन मिळून त्यांची आत्मनिर्भरता वाढेल आणि पिंपरी चिंचवडमध्ये उद्योजक महिलांची नवी पिढी घडेल.”
>
> — ममता शिंदे, उप आयुक्त,
> समाज विकास विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**पिंपरी: प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत महिला व बालकल्याण योजना अंतर्गत मौजे आकुर्डी येथील खाद्यपदार्थ केंद्रातील गाळे महिला बचत गटांना भाडेकराराने देण्यासाठी ३० सप्टेंबर रोजी ई-लिलावाचे आयोजन करण्यात आले होते. या लिलावात तब्बल ९७ महिला बचत गटांनी सहभाग नोंदवला.

आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह व अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मे. रिलायन्स ऑकशन चे प्रतिनिधी इब्राहीम खान यांच्या सहकार्याने एकूण ४९ गाळे ई-लिलावासाठी उपलब्ध करून देण्यात आले. त्यात दिव्यांग महिला बचत गटांसाठी २, तृतीयपंथी गटासाठी १, कोविड योद्धा महिला बचत गटासाठी १, आदिवासी महिला बचत गटासाठी २, DAY-NULM अंतर्गत ३, तर पीसीएमसी सक्षमा अंतर्गत नोंदणीकृत महिला बचत गटांसाठी तब्बल ४० गाळ्यांचे आरक्षण करण्यात आले.

या ई-लिलावात १५,१०० रुपये ते ३२,००० रुपये या दरम्यान बोली लावली गेली. विशेष म्हणजे, महिला बचत गटांना गाळे वाटप करण्यासाठी आयोजित केलेला हा देशातील पहिलाच ई-लिलाव ठरला आहे.गाळे प्रथम तीन वर्षांसाठी भाड्याने देण्यात येणार असून कामकाज समाधानकारक असल्यास पुढील दोन वर्षांची मुदतवाढ मिळेल. भाडे व देखभाल शुल्काचा भरणा संबंधित गटानेच करायचा आहे. विलंब झाल्यास दंड आकारला जाईल. गाळ्यांचा वापर केवळ नोंदणीकृत बचत गटांनाच करता येणार आहे.

# पुरंदर विमानतळाच्या जमीन मोजणीला गती

## सुमारे 802 एकर मोजणी प्रक्रिया पूर्ण : शेतकऱ्यांना मोबदला आणि परताव्याबाबत प्रस्ताव



**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संमतिपत्रे दिलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीच्या मोजणी प्रक्रियेला प्रारंभ झाल्यानंतर त्याला गती मिळण्यास सुरुवात झाली आहे. आतापर्यंत ८०२ एकर जमिनीची मोजणी पूर्ण झाल्याची माहिती जिल्हा प्रशानसाकडून देण्यात आली.

पुरंदर विमानतळासाठी संमतीने जागा देण्याची मुदत संपुष्टात आल्यानंतर गेल्या शुक्रवारपासून प्रत्यक्ष मोजणी प्रक्रियेला जिल्हा प्रशासनाकडून सुरुवात करण्यात आली. मोजणी प्रक्रिया येत्या २० ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

मोजणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दरनिवाडा निश्चित करून शेतकऱ्यांना देण्यात येणारा मोबदला आणि परताव्याबाबत सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर थेट भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

जमिनीची मोजणी करण्यासाठी प्रारंभी जिल्हा प्रशासनाकडून पाच स्वतंत्र पथकांची स्थापना करण्यात आली होती. मात्र, ही प्रक्रिया वेगाने व्हावी, यासाठी आणखी एक पथक स्थापन करण्यात आले आहे. महसूल, वन, सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषी विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुरंदर उपसा सिंचन योजनेतील अधिकाऱ्यांचा या पथकामध्ये समावेश आहे.

फळझाडे, शेतविहिरी आणि जलवाहिन्यांचे मूल्यांकन मोजणी प्रक्रियेत करण्यात येत आहे. ही सर्व प्रक्रिया शांततेत सुरू असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

पुरंदर विमानतळासाठी पारगाव, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, उदाचीवाडी आणि वनपुरी अशा सात गावांमधून जमीन संपादित होणार आहे. विमानतळासाठी एकूण तीन हजार एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे. संमतिपत्रे देण्याच्या कालावधीत ३ हजार २२० शेतकऱ्यांनी २ हजार ८१० एकर जागेचे संपादन करण्यासंदर्भातील संमतिपत्रे सादर केली आहेत.

### प्रमुख मुद्दे...

- **मोजणी प्रक्रियेला वेग:** पुरंदर येथील प्रस्तावित विमानतळासाठी शेतकऱ्यांकडून संमतिपत्रे मिळाल्यानंतर ८०२ एकर जमिनीची मोजणी पूर्ण.
- **२० ऑक्टोबरपर्यंत मोजणी पूर्ण करण्याचे लक्ष्य:** जिल्हा प्रशासनाने ही प्रक्रिया २० ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे.
- **नवीन पथकांची स्थापना:** सुरुवातीला पाच पथकांची नियुक्ती झाली होती, परंतु कामाला वेग येण्यासाठी आणखी एक पथक तयार करण्यात आले आहे.
- **विभागीय समन्वय:** महसूल, वन, सार्वजनिक बांधकाम, कृषी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पुरंदर उपसा सिंचन योजनेतील अधिकारी पथकात समाविष्ट.
- **संपूर्ण प्रक्रिया शांततेत:** मोजणीसह फळझाडे, शेतविहिरी, जलवाहिन्यांचे मूल्यांकन सुरू असून सर्व प्रक्रिया शांततेत पार पडत आहे.
- **सात गावांतून जमीन संपादन:** पारगाव, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, उदाचीवाडी व वनपुरी या सात गावांतील ३,००० एकर जमिनीचे संपादन होणार.
- **९५% जमीन संमतीने ताब्यात येण्याची शक्यता:** ३,२२० शेतकऱ्यांकडून २,८१० एकर जमिनीबाबत संमतिपत्रे मिळाल्याने ९५% जमीन ताब्यात घेण्याचा मार्ग मोकळा.
- **दरनिर्धारणानंतर भूसंपादन:** मोजणी पूर्ण झाल्यावर दरनिवाडा ठरवून शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात येणार, त्यानंतर प्रत्यक्ष भूसंपादन सुरू होईल.

# निळ्या पुररेषेतील अवैध बांधकामांची यादी जाहीर!

## पवना, मुळा व इंद्रायणी नदीपात्रात 1 हजार 686 बांधकामे नियमबाह्य



**पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतून वाहणाऱ्या पवना, मुळा व इंद्रायणी नदीपात्रात अंतर्गत निळ्या पुररेषेत येणाऱ्या अनधिकृत बांधकामांची यादी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर यांच्या आदेशानुसार आठही क्षेत्रीय कार्यालयांतर्फे सखोल पाहणी करून संबंधित यादी तयार करण्यात आली आहे. या यादीत एकूण १,६८६ अनधिकृत बांधकामे आढळून आली असून त्यामध्ये व्यावसायिक दुकाने, रहिवासी घरे, पत्राशेड, आरसीसी बांधकामे, कच्च्या विटांची घरे तसेच भंगार दुकाने यांचा समावेश आहे.

नदीपात्रातील निळ्या पुररेषेत येणारी ही बांधकामे पूरप्रवण क्षेत्रात असल्यामुळे येथील अनधिकृत बांधकामांबाबत कोणतेही खरेदी-विक्री व्यवहार अथवा नोंदणी होऊ नये तसेच सामान्य नागरिकांची फसवणूक टाळली जावी यासाठी आयुक्त शेखर सिंह यांच्या आदेशानुसार बाधित बांधकामांची यादी तयार करून दुय्यम निबंधक, पुणे कार्यालयास सादर करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामार्फत संबंधित अनधिकृत बांधकामांवर नोटीस देण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड शहराच्या नदीपात्रातील निळ्या पुररेषेत येणाऱ्या अनधिकृत बांधकामांपासून दूर राहावे, आणि कोणतेही आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी आवश्यक ती शासकीय पडताळणी करावी, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### निळ्या पुररेषेमधील अनधिकृत बांधकामांची माहिती...

| क्षेत्र | दिलेल्या नोटिसांची संख्या | बाधित भागाची ठिकाणे |
|---|---|---|
| अ | १६८ | भाटनगर, पिंपरी स्टेशन, पिंपरी मेन मार्केट |
| ब | ३१२ | वाल्हेकरवाडी, भोंडवे कॉर्नर,, रावेत, केशवनगर, कासारवाडी |
| क | ३३१ | रिव्हर रेसिडेन्सी, जाधववाडी,मोईफाटा, कुदळवाडी |
| ड | ३९१ | वाकड गावठाण, पिंपळे सौदागर,, रहाटणी, पिंपळे निलख |
| ई | ५९ | मोशी टोलनाका, दाभाडे वस्ती, डूडूळगाव गावठाण |
| फ | ८६ | डिफेन्स कॉलनी, बग वस्ती, पाटीलनगर |
| ग | १७५ | पिंपरीगाव, पिंपरी वाघेरे, सुभाषनगर, संजयगांधी नगर |
| ह | १६४ | सांगवी, दापोडी, कासारवाडी |
| | एकूण संख्या : १६८६ | |

# Good News: पुण्याचा आरोग्याचा आता प्रश्न सुटणार!

## राज्य सरकारचा दीड हजार कोटींचा प्रस्ताव : लवकरच सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभे राहणार!

**पुणे | प्रतिनिधी**

औंध जिल्हा रुग्णालयाच्या आवारात लवकरच सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभे राहणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाचे दोनशे रुग्णशय्येचे सुपर स्पेशालिटी आणि दोनशे रुग्णशय्येचे महिला रुग्णालयाचा प्रस्ताव आहे.

हा प्रस्ताव जिल्हा शल्यचिकित्सकांनी मंजुरीसाठी आरोग्य विभागाच्या सहसंचालकांकडे पाठविला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाची औंध परिसरात ८५.१९ एकर जागा आहे. त्यातील औंध जिल्हा रुग्णालयाकडे ३५ एकर जागा आहे. या जागेवर सहा जुन्या इमारती आहेत. या इमारती सुस्थितीत नसून, त्या राहण्यासाठी धोकादायक आहेत. या इमारती एकूण ६ हजार २८२ चौरस मीटर जागेवर आहेत. या इमारतींच्या मधोमध १ हजार ८५८ चौरस मीटरची मोकळी जागा आहे. या जुन्या इमारती पाडून एकूण ८ हजार १४० चौरस मीटरची जागा उपलब्ध होणार आहे. या जागेवर नवीन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि महिला रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यम्पल्ले यांनी १९ सप्टेंबरला आरोग्य विभागाच्या सहसंचालकांना पाठविला आहे.




पुणे जिल्ह्याची लोकसंख्या १ कोटी २५ लाख ४० हजार असून, पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन महापालिका आहेत. याचबरोबर औद्योगिक क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान (आयटी) केंद्र, शैक्षणिक संस्था परिसरात आहेत. यामुळे जनतेच्या आरोग्यासाठी सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव आहे. सुपरस्पेशालिटी रुग्णालयाची अंदाजे १ हजार ५२७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

या रुग्णालयासाठी कर्मचाऱ्यांच्या ५९६ जागा भराव्या लागणार आहेत. याचवेळी महिला रुग्णालयासाठी कर्मचाऱ्यांच्या ९७ जागा भराव्या लागणार आहेत. या कर्मचाऱ्यांचा वार्षिक वेतनाचा खर्च ३२.३१ कोटी रुपये होणार आहे, असे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे.

### ससून रुग्णालयावर ताण...

» पुणे शहराची सर्व दिशांनी होत असलेली वाढ आणि जिल्ह्याची लोकसंख्या विचारात घेता शासकीय अत्याधुनिक यंत्रणेची आणि शहरात शासनाने एकही महिला रुग्णालय नसल्यामुळे या रुग्णालयांची नितांत आवश्यकता आहे. पुणे परिसरात सध्या वैद्यकीय शिक्षण विभागाचे ससून सर्वोपचार रुग्णालय आहे. या रुग्णालयावर वाढत्या लोकसंख्येमुळे ताण येत आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या मधोमध असलेल्या औंधमध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारल्यास त्याचा फायदा दोन्ही शहरांतील रुग्णांना होईल, असेही प्रस्तावात स्पष्ट करण्यात आले आहे.

> औंध जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि महिला रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव जिल्हा शल्यचिकित्सकांकडून आला आहे. हा प्रस्ताव राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडे पाठविण्यात आला आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर रुग्णालय उभारण्याचे काम सुरू होईल.
>
> **– डॉ. भगवान पवार, उपसंचालक, आरोग्य सेवा.**

# औद्योगिक वीजपुरवठ्याबाबत महावितरणसोबत बैठक

## नव्या सबस्टेशन प्रकल्पांसह तातडीच्या उपाययोजनांना गती देण्याचे आश्वासन

**पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी**

भोसरी येथील महावितरण कार्यालयात पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेचे पदाधिकारी व महावितरणचे वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत मासिक आढावा बैठक पार पडली. या बैठकीत वीजपुरवठ्याशी संबंधित अनेक तातडीच्या प्रश्नांवर चर्चा होऊन उपाययोजना ठरविण्यात आल्या.

बैठकीस संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, सचिव जयंत कड, संचालक नवनाथ वायाळ, सचिन आदक, मा. नगरसेवक संजय वाबळे, तसेच महावितरणचे मुख्य अभियंता सिंहाजीराव गायकवाड, कार्यकारी अभियंता अतुल देवकर, सहाय्यक अभियंता माने, जाधव व भगत उपस्थित होते.

मुख्य अभियंता गायकवाड यांनी माहिती दिली की, कॅनबे चौक, तळवडे येथे होणाऱ्या नव्या सबस्टेशनसाठी ॲप्रूव्हल मिळाल्यानंतर लवकरच कामाला सुरुवात होणार आहे. औद्योगिक परिसरातील गरजेनुसार जुन्या केबल बदलण्याची कामे सुरू आहेत. तसेच भोसरीतील सेक्टर ७ आणि १० मधील फॅसिलिटी सेंटर परिसरातून प्रत्येकी १००० चौ. मी. जागा सबस्टेशनसाठी पी.एम. आर.डी.एकडून घेण्यास मान्यता मिळाली आहे.

भोसरी शांतीनगर येथे नाल्याच्या शेजारी २०० क्षमतेचे दोन ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे निर्देश देण्यात आले. याशिवाय तळवडे, ज्योतिबानगर, सोनवणे वस्ती व शेलारवस्ती येथे जागा उपलब्ध झाल्यास तिथेही प्रकल्प राबविण्याचा विचार केला जाईल. यावेळी विजेचे साहित्य वेळेवर उपलब्ध करून देण्याचे, झाडांच्या फांद्या वेळेवर छाटण्याचे, डी.पी. बॉक्सची झाकणे नसल्यास नवी झाकणे बसविण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले.



बैठकीचा समारोप करताना गायकवाड यांनी उद्योजक व महावितरण यांच्यातील समन्वयासाठी दर महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी अशाच आढावा बैठका नियमितपणे घेण्यात येतील, असे सांगितले.

> "पिंपरी-चिंचवड औद्योगिक क्षेत्र हे महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीत मोलाचा वाटा उचलत आहे. या भागातील उद्योगांना अखंड व स्थिर वीजपुरवठा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. भोसरी महावितरण कार्यालयात झालेल्या मासिक आढावा बैठकीत अनेक तातडीचे वीजविषयक प्रश्न मांडण्यात आले आणि त्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी सकारात्मक पावले उचलण्याचे आश्वासन दिले. नव्या सबस्टेशन प्रकल्पांपासून ते जुन्या केबलच्या बदलासारख्या कामांवर भर देण्यात येत आहे, ही स्वागतार्ह बाब आहे.
>
> **— संदीप बेलसरे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटना.**